# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**डॉ.नामदेव कृष्णा मोळे** विभाग प्रमुख मराठी म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी

---

प्रस्तावना-

महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर व्यक्तींनी आपल्या विचारातून आणि कृतीतून समाजात परिवर्तन घडवून आणलेले आहे. समाज परिवर्तनाच्या चळवळीत महात्मा फुले ,राजर्षी शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी फार मोठे योगदान दिलेले आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वातंत्र्य मिळाल्या नंतरच्या सुधारणांमध्येही त्यांचे योगदान फार मोलाचे आहे. भारतातील दलित आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य खर्ची घातलेले आहे.

एकोणिसाव्या शतकापासून भारतीय आर्थिक विचाराच्या मांडनीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाचा सखोल अभ्यास करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घटना तज्ञ, कायद्याचे गाडे अभ्यासक, संसद पट्टू राजकारणी अशा विविध पदव्यानी ओळखले जाते परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्रतज्ञ म्हणून त्यांची ओळख आपल्याला दुर्मिळ दिसून येते. बाबासाहेबांनी भारतातील सर्वकष व्यवस्था बदलून नवीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महामानव होते. समाजातील सर्व घटकांच्यासाठी बाबासाहेबांचे योगदान महत्त्वाचे आहे. ते फक्त दलितांचे कैवारी नाहीत तर समाजातील सर्व घटकांचे कैवारी आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेती, शेतकरी, पाणी प्रश्न, ऊर्जा धोरण, आदिवासी, ओबीसी, स्त्रिया, शिक्षण, राजकारण, भारतीय घटनेचे शिल्पकार ,लोकसंख्या नियंत्रण, कुटुंब नियोजन, साहित्य आणि आर्थिक विचार अशा अनेक गोष्टीवर बाबासाहेबांनी आपले लक्ष केंद्रित केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व गोष्टी बरोबरच मुंबई येथे "शेडनहॅम" कॉलेजमध्ये 1818 ते 1920 या कालावधीत अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून ही काम केलेले आहे.

आर्थिक विचार-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सखोल अध्ययन करून आर्थिक विषयावर सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यांचे आर्थिक विचार हा भारतीय लोकशाहीचा मूलभूत पाया आहे. त्यांचे विचार तात्कालीक स्वरूपाचे नाहीत.त्यांनी प्रबंध लेखनाच्या स्वरूपात,भाषणाच्या स्वरूपात, जाहीरनाम्याच्या स्वरूपात आणि विधेयकाच्या स्वरूपात असे विविध अंगी आर्थिक विचार मांडलेले आहेत. त्यांच्या आवडीचा विषय अर्थशास्त्र हाच होता. त्यांनी अर्थविषयक आणि जिवनापयोगी विचार मांडलेले आहेत. भारतातील आर्थिक स्थिती गतीचे, आर्थिक नीतीचे आणि लाभार्थीच्या आर्थिक व्यवस्थांचे विवेचन, विश्लेषण त्यांनी केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठातून एम.ए.ही अर्थशास्त्राची पदवी घेऊन त्यामध्ये चांगल्या प्रकारचे संशोधन केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीएच. डी च्या पदवीकरिता "भारताचा राष्ट्रीय नफा एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास"(A National Divident : A Historic and Analytcal Study) हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला हाच प्रबंध 1925 मध्ये"ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त" या नावाने प्रकाशित करण्यात आला. या प्रबंधात ईस्ट इंडिया कंपनीची महसुलाची पद्धत दिलेली आहे. महसुलाचे प्रमाण, महसुलाचा खर्च, इतर कर वसुलीचे विविध स्रोत, कराच्या ओझ्याखाली भरडली जाणारी जनता, सत्तेच्या लोभापोटी लष्करावरील खर्च त्यामुळे विकासाकडे होणारे दुर्लक्ष, आर्थिक विकासाऐवजी जनतेचे होणारे नुकसान याबाबत मोलाची माहिती या ग्रंथात दिलेली आहे . ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि त्यांची अर्थनीती या त्यांच्या 42 पानांच्या लघुशोध प्रबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1792 ते 1858 या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन आणि वित्तनीती संबंधीच्या धोरणातील बदलांचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. या कंपनीच्या धोरणामध्ये जो बदल आहे त्याचा भारतीय जनतेवर कसा अन्याय झालेला आहे याचे विदारक आर्थिक विश्लेषण त्यांनी या प्रस्तुत लघुशोध प्रबंधात केलेले आहे. या ईस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या व्यापाराचा अधिकार होता परंतु ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यांना अजिबात आवडत नव्हती आणि या अधिकाराचा मोबदला म्हणून यांना त्या कारणाने ब्रिटिश सरकार स्वतःचा फायदा करून घेण्याची संधी सोडत नव्हते. या सर्व गोष्टीची झळ भारतीय जनतेला सोसावी लागत होती. आपल्या भारतातील लोकांचे या इंग्लंड साठी प्रचंड आर्थिक योगदान आहे परंतु इंग्लंडने भारतातील लोकांच्यासाठी अजिबात योगदान दिलेले नाही. अशी टिका डॉ. बाबासाहेबांनी केलेली आहे. या ब्रिटिश सरकारचे भारतासाठी जे योगदान आहे ते प्रामुख्याने गैर आर्थिक स्वरूपाचे आहे. 1792 ते 1857 या काळात कंपनी सरकार आणि ब्रिटिश सरकारने भारतीय लोकांची फार मोठी पिळून केलेली आहे. भारतातील जनतेवर अनेक प्रकारचे वेगवेगळे कर लावून जनतेला पिळून काढलेले आहे. जमिनीवरील कर फार जाचक होते.

शेतकरी वर्ग या त्यांच्या करामुळे भरडून गेलेला होता. महसूल आणि सरकारी कर्ज या स्वरूपात उभारलेल्या पैशाचा विनियोग जनतेसाठी कमी प्रमाणात केला जायचा. 1858 मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त झाल्यानंतर कंपनी सरकारवर असलेल्या 693 लाख पौंड खर्चाचा बोजा भारतीय जनतेवर टाकून या ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेवर कशा पद्धतीने अन्याय केला आहे याचे अतिशय प्रभावी आणि मार्मिक विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या ग्रंथात केलेले आहे.

चलनविषयक-

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजेच 1835 पूर्वी भारतात सुवर्ण मानक आणि रुपयाचे रौप्य मानक अशी द्विमान चलन पद्धती प्रचलित होती. 1835 च्या कायद्यानुसार सुवर्ण मानक रद्द करून देशभर एकधातू मानावर आधारित चलन पद्धती सुरू झाली आणि त्यानुसार रुपयाच्या परिमाणाच्या स्वरूपात चलन पद्धतीचे एकत्रीकरण करण्यात आले. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात की रौप्य मानकाच्या मर्यादा स्पष्ट झाल्यानंतर देखील सुवर्णमाणकाचा स्वीकार न करता रोप्यमानकाच्या जोडीने सरकारी कागदी चलनाचा चंचू प्रवेश करण्यात आला ही बाब चलनाच्या संदर्भात दुर्दैवी असल्याचे दिसून येते. सोने आणि चांदीच्या तुलनात्मक आकडेवारीचा तपशीलवार आढावा घेऊन बाबासाहेबांनी असा निष्कर्ष काढला की रुपयांच्या अवमूल्यनात चांदीचा अतिरिक्त पुरवठा जबाबदार नाही तर जगातील प्रमुख देशाने रौप्यमानकाचा त्याग केल्यामुळे रूपया पौंड विनिमय दरात विसंवाद निर्माण झालेला दिसून येतो.सोने चांदीचा विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले आहे याबाबतचे सविस्तर विवेचन त्यांनी केलेले आहे. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात की भारत हा स्वतः रौप्यमानक स्वीकारलेला परंतु सुवर्ण मानक स्वीकारलेल्या देशाशी कनिष्ठपणे जखडलेला देश असल्यामुळे त्याचे आर्थिक वित्तीय जीवन सोने आणि चांदीच्या तुलनात्मक किमतीवर अंमल गाजवणाऱ्या आणि पर्यायाने रुपया पौंड विनिमय दराचे नियंत्रण करणाऱ्या आंधळया शक्तीच्या अधीन होते आणि या सर्व घटनांची तार्किक परिणती म्हणून सुवर्ण मानकांची मागणी पुढे आली.भारतातील चलन आणि वित्ताच्या रॉयल कमिशन पुढे आंबेडकरांनी 15 डिसेंबर 1925 ला जी साक्ष दिली त्यामध्ये ते स्पष्टपणे नमूद करतात की चलन निर्मिती करणाऱ्या संस्थेच्या चलन निर्मितीच्या क्षमतेवर अंकुश असण्याची आवश्यकता आहे अन्यथा अनिर्बंध चलन पुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.डॉ. बाबासाहेबांनी इंग्लंडमध्ये 1923 मध्ये डी. एस.सी अर्थशास्त्र परीक्षेसाठी “दि प्रॉब्लेम ऑफ रुपी: इट्स ओरिजिन अँड सोल्युशन” (रुपयाची समस्या त्याचे उगम आणि उपाय) हा प्रबंध सादर केला. यामध्ये चलनविषयक विचार मांडलेले आहेत. भारतीय रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी त्यांनी चलन निर्मितीची मर्यादा ठरविण्यात यावी, चांदीचे नाणी बंद करावी, कागदी चलन स्वीकारावे व चांदीची नाणी वितळून त्यातून मिळणाऱ्या चांदीतून विक्री करून प्राप्त होणाऱ्या रकमेतून सरकारने महसूल उपयोगात आणावी.त्यांचे हे चलन विषयक विवेचन देशाच्या चलन व्यवस्थेला व अर्थव्यवस्थेला दिशादर्शक ठरतात.वर्तमान परिस्थितीत बाबासाहेबांचे विचार तेवढेच उपयुक्त आहेत.

औद्योगिकीकरण-

भारत हा कृषी प्रधान देश त्यामुळे भारतातील लोकांची सर्व शक्ती शेतीकडेच वळवावी अशी काही लोकांची मते आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या देशात असताना त्यांनी पाहिले होते की औद्योगीकरणामुळे देशाचा आर्थिक विकास अधिक झपाट्याने होत असतो. त्यामुळे आपल्या भारताचा आर्थिक विकास व्हायचा असेल तर औद्योगीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे, त्याची आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. आपल्या देशातील मजुरांना उत्पादन कार्यामध्ये गुंतवण्यासाठी औद्योगीकरणावर सरकारने भर दिला पाहिजे त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे आले पाहिजेत, खेडी शहरांना जोडली गेली पाहिजेत त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक प्रगती चांगली होईल व खेड्यांचा विकास होईल असे बाबासाहेबांचे विचार आहेत.औद्योगिकीकरण हे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असते औद्योगिकीकरणामुळे देशाचा आर्थिक विकास होत असतो फक्त शेतीवरच देशाची आर्थिक प्रगती शक्यच नसते हे बाबासाहेब जाणून असल्यामुळे त्यांनी भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगीकरण जास्त महत्त्वाचे आहे असे त्यांचे विचार होते. देशात औद्योगीकरण झपाट्याने झाले नाही तर शेती क्षेत्रात अतिरिक्त लोकसंख्या वाढते यामुळे शेती क्षेत्रात लोकसंख्या जरी वाढली तरी उत्पन्न वाढत नाही त्यामुळे प्रगती होत नाही. बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जाते आणि हे कमी करण्यासाठी औद्योगीकरणाचा झपाट्याने विकास झाला पाहिजे. औद्योगिकरणामुळे देशात रोजगाराच्या संधी मोठ्या संख्येने वाढल्याने जनतेची सामाजिक व आर्थिक पिळवणूक थांबण्यास मदत होईल. देशामध्ये जे महत्त्वाचे मूलभूत उद्योग ते सरकारच्या मालकीचे असावेत सरकारने चालवावेत तसेच इतर उद्योग खाजगी असावेत.भारत स्वतंत्र झाल्यावर बाबासाहेबांच्या या मताचा विचार करून केंद्र सरकारने पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. शेती

क्षेत्रात बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे, ही बेकारी कमी करण्यासाठी देशात औद्योगीकरणाचा झपाट्याने विकास झाला पाहिजे. जर देशात चांगल्या प्रकारचे औद्योगीकरण वाढीस लागले तर देशातील लोकांना चांगला रोजगार मिळेल त्यामुळे लोकांचा सामाजिक स्तर व आर्थिक स्थिती म्हणजे त्यांचा दर्जा सुधारेल.

शेतीविषयक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेतीप्रधान ग्रामीण जीवन आणि अर्थव्यवस्था हा चिंतनाचा विषय होता. शेतीविषयक प्रश्नावर अतिशय सखोल चिंतन करून मार्मिक असे निष्कर्ष डॉ. बाबासाहेबांनी काढलेले दिसून येतात. त्यानी 1918 मध्ये "लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय" या ग्रंथाचे लेखन करून भारतातील शेती चांगल्या पद्धतीने फायद्याची ठरण्यासाठी त्यावर आपल्याला काय उपाय करता येतील याची मांडणी केलेली आहे. हा लेख शेतीविषयक प्रश्नावरील मूलभूत भाष्य करणारा आहे. त्यांनी भारतीय शेतीचा सखोल अभ्यास करून शेतीची उपयुक्तता किती आहे हे देशाला सांगितलेले आहे. त्यांच्या चिंतनांमधून, अध्ययनामधून भारतीय शेतीच्या संदर्भात चांगल्या प्रकारची माहिती दिलेली आहे. शेतीत कोणकोणती पिके घ्यावी, त्यासाठी लागणाऱ्या साधनांचे उत्पादन कसे करावे, शेतीच्या गटाचे क्षेत्र किती असावे, शेतजमीन धारणेचे पोट प्रकार कोणते असावेत इत्यादी.त्यांच्या मते इतर देशाच्या तुलनेत भारतातील शेतीचे उत्पन्न कमी निघण्याचे कारण म्हणजे शेतीचे विभाजन, छोटे- छोटे तुकडे पडलेले आहेत हे थांबले पाहिजे. शेत जमिनीचे जेवढे लहान तुकडे पडतात व विखुरतात तेवढे त्याचे दुष्परिणाम होतात असे दुष्परिणाम टाळण्यासाठी जमिनीचे एकत्रीकरण हा महत्त्वाचा उपाय त्यांनी सुचविला. शेत जमिनीचा हा प्रश्न उत्पादनावर अधिष्ठित पाहिजे व त्यासाठी उत्पादनाचे घटक योग्य त्या प्रमाणात एकत्र आणले पाहिजे त्याच पद्धतीने शेतजमिनींच्या प्रश्नाकडे उत्पादनांचा धंदा म्हणूनच पाहिले पाहिजे असे त्यांना वाटते, आणि यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीचा आकार ही परिणामकारक उत्पादन वाढावे यासाठी नीर्णायक बाब नसते. त्यांच्या मते जमिनीचे लहान तुकडे जरी झाले तरी जमिनीचा लहान भाग उत्पादनाच्या आड येतअसतो हे बाबासाहेबांना पटत नाही.त्याचप्रमाणे जमिनीची विक्री थांबली पाहिजे, जमीन विकली तर शेजारच्याच माणसाला विकावी त्याचप्रमाणे भारतातील शेतकऱ्यांना पुरेसे भांडवल मिळत नाही. यामुळे शेतीची उत्पादकता कमी होते. फक्त शेतीचा आकारच मोठा असून चालणार नाही त्यासाठी पर्याप्त भांडवल उपलब्ध असणे गरजेचे आहे. तरच शेतीची उत्पादकता वाढेल. सहकारी शेतीची उपयुक्तता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केलेली आहे यासाठी त्यांनी फ्रान्स, रूमालिया या देशातील शेतीची उदाहरणे दिलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कीफायतशीर धारण क्षेत्र मिळविण्यासाठी कार्यक्षम मशागत करण्यासाठी आवश्यक असणारी जी सामग्री आहे आणि त्यांचं धारण क्षेत्र यांचा योग्य मेळ घातला पाहिजे असं त्यांचं मत आहे. लहान धारण क्षेत्र ही भारतीय शेतीची समस्या नसून शेतीमध्ये वापरणारे जे घटक आहेत विशेषत: भांडवल आणि इतर सामग्री यांचा जो योग्य प्रमाणात वापर करता येत नाही ही खरी समस्या आहे. शेतीमध्ये उत्पादन कमी झाल्यामुळे माणसाकडे पैसा कमी येतो. त्यामुळे भांडवल कमी पडते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शेती हाच भारतीय व्यवस्थेचा खरा आधार आहे यासाठी शेतीमधील उत्पादन वाढणे गरजेचे आहे त्यासाठी यांत्रिक पद्धतीने शेती करणे, सहकारी व सामुहिक शेती करणे असे त्यांनी सुचविलेले आहे. आपल्या देशामध्ये कितीतरी जमीन पडीक आहे ती लागवडीखाली आली पाहिजे त्यामुळे आपल्या देशातील भूमीहीन लोकांचा प्रश्न सुटेल यासाठी त्यांनी सामुदायिक शेती वरती भर दिलेला आहे. त्यांच्या मते शेती हा शासकीय उद्योग असावा. रशियाच्या धरतीवर आपल्याकडे सामुदायिक शेतीचा प्रयोग राबविला तर आणखीनच चांगले होईल असे त्यांनी म्हटले आहे.

भारतीय शेतीमध्ये खोती पद्धत व सावकारशाही हा एक मोठा गंभीर प्रश्न होता. पूर्वीच्या मुंबई प्रांतात विशेषत: ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यात कमी प्रतीची म्हणजेच निकृष्ट दर्जाची जमीन ही फसवणूकी ची पद्धत होती . त्यामध्ये प्रत्यक्षपणे जो सारा वसूल केला जातो तो खोतच करीत असतो तो सरकार दरबारी किती भरतो आणि काय करतो याचे शेती करणाऱ्या लोकांना कळत नाही. त्यामुळे शेती करणारी कुळे व सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. म्हणजे ही एक प्रकारची जमीनदारीच होती. त्या भागातील शेतकऱ्यांचे दारिद्र्य, त्यांची पिळवणूक हा मोठा ज्वलंत प्रश्न होता. शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना कमालीचे श्रम करून देखील त्यातून मिळणारा जो मिळकतीचा भाग आहे तो सावकार आणि सरकारला द्यावा लागतो आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी ही गुलामगिरीच आहे असे म्हटले आहे. बाबासाहेबांनी एप्रिल1929 मध्ये रत्नागिरी येथे भरलेल्या गरीब व दलित वर्गीयांच्या परिषदेत ही खोती पद्धत रद्द करण्यासाठी त्यांनी जनतेला हाक दिली ही खोती गरिबांचे रक्त शोषण करते. ही पद्धत नाहीशी केल्याने शांतता आणि प्रगती साधेल असे मत मांडून त्या पद्धतीविरुद्ध त्यांनी चळवळ करण्याची प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांनी सप्टेंबर 1937 मध्ये मुंबई विधिमंडळात ही खोती पद्धत रद्द करण्यासंबंधी एक विधेयक मांडले त्यामध्ये जमीन कसणाऱ्यांना कुळाचे वहिवाटीचे हक्क मिळावे आणि रयतवारी पद्धती

आणावी हे विधेयक होते. खोताना योग्य अशी नुकसान भरपाई देण्याचा उद्देश ही त्या विधेयकात सांगितला होता. या विधेयकामुळे जमीनदाराकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला. ही खोती पद्धत प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरूपाचे कायदे करणे आले. डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय एकात्मतेवर भर घातली. बाबासाहेबांनी जमीन महसुलाच्या बाबतीत असे मत मांडले आहे की विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुल नसावा. जमीन महसुलाच्या बाबतीत गरीब व श्रीमंत यांना सारखाच कर भरावा लागत असतो आणि म्हणून त्यांनी जमीन महसूल संहितेचे लँड रेवेन्यू कोड यामध्ये 107 नंबरचे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्ती कराच्या कक्षेत आणली पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. आपल्या देशात आजही काही मर्यादेपर्यंत शेतसारा रद्द करावा आणि शेतीचे अधिक उत्पन्न असणाऱ्यांना प्राप्तिकर बसवावा असे सुरू आहे. आजच्या या पुरोगामी चळवळीला जुळतील असेच विचार त्यावेळी बाबासाहेबांनी मांडले. त्यांच्या या विचारांची भारतीय शेती क्षेत्राला त्याचबरोबर अनेक क्षेत्रांना देखील नितांत गरज आहे बाबासाहेबांच्या या शेतीबाबतच्या चिंतनातून आपल्याला असे दिसून येते की बाबासाहेबांच्या मतानुसार जर शेतीमध्ये सुधारणा झाल्या तर भारत सुद्धा एक प्रगतशील देश बनू शकतो त्यासाठी देशातील उपलब्ध जमीन, मनुष्यबळ, संसाधने, भांडवल, तंत्रज्ञान आणि विकास पूरक जे घटक आहेत त्यामध्ये समन्वय होणे गरजेचे आहे.

इतर आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चलन विषयक, कृषी विषयक, औद्योगिकीकरणाबाबत सविस्तर विचार मांडले आहेत त्या बरोबरच इतरही काही आर्थिक विचार मांडले आहेत. भारतीय अर्थशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करत असताना ते असे म्हणतात की अर्थशास्त्रात संपत्तीच्या व आर्थिक व्यवहारांच्या अभ्यासाबरोबरच समाज कल्याणाचाही विचार अर्थशास्त्रात असणे गरजेचे आहे. त्यांच्या मते संपत्तीचे वाटप सर्वांना समान असावे. जातीव्यवस्थेबद्दल सुद्धा ते नमूद करतात की जोपर्यंत जातीव्यवस्था समूळ नष्ट होणार नाहीत तोपर्यंत भारताचा आर्थिक विकास होणार नाही. त्यांच्या मते जातीव्यवस्था श्रमिकांच्या अनैसर्गिक विभागणीस कारणीभूत आहे. राष्ट्राच्या प्रगतीसाठी राष्ट्रीय संपत्ती वाढली पाहिजे. त्याचप्रमाणे समाजातील आर्थिक विषमता नष्ट झाली पाहिजे याशिवाय राष्ट्राची प्रगती होणार नाही. देशातील दारिद्र्य जर संपवायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याशिवाय राष्ट्रीय उत्पन्न वाढणार नाही व लोकांचं जीवनमान सुधारणार नाही.

समारोप-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक क्षेत्रात राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय असे काम आहे. त्यांनी या सामाजिक, राजकीय, क्षेत्राबरोबरच, अर्थशास्त्रीय विचारही चांगले उपयुक्त मांडलेले आहेत. अर्थशास्त्रीय विचारात भर घातलेली आहे. त्यांचे कार्य सामाजिक क्षेत्रात राजकीय क्षेत्रात ठळकपणे दिसून येत असले तरी खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी तत्कालीन परिस्थितीत मांडलेले अर्थशास्त्रीय विचार आजच्या काळात ही उपयुक्त असलेले दिसून येतात. त्यानी अर्थशास्त्राचे केलेले विश्लेषण हे तात्विक पातळीवर व व्यावहारिक दृष्ट्या दोन्ही बाजूंनी केलेले परिपूर्ण असे विश्लेषण आहे. त्यांनी केलेली चलन विषयक चर्चा तर फार मूलभूत स्वरूपाची होती. औद्योगिकीकरणाच्या बाबतीत तर त्यांनी योग्य आणि दिशादर्शक असेच विचार मांडलेले आहेत .औद्योगीकरणामुळेच देशाचा आर्थिक विकास अधिक झपाट्याने होत असतो. त्यामुळे आपल्या भारताचा आर्थिक व विकास व्हावयाचा असेल तर औद्योगीकरण आवश्यकच आहे असे त्यांचे मत आहे. उद्योगधंदे शहरी भागात उभारले पाहिजेत त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे येतील. त्यांची आर्थिक प्रगती सुधारेल असे त्यांचे मत आहे. शेती बाबत विचार मांडत असताना त्यामध्ये शेतीत पिके कोणती घ्यावीत, त्यासाठी लागणारे साधनांचे उत्पादन कसे करावे, शेतीच्या गटाचे क्षेत्र किती असावे, शेत जमीन धारणाचे प्रकार कोणते याची विस्तृत मांडणी केलेली आहे. इतर देशाच्या मानाने भारतीय शेतीचे उत्पादन कमी का होते याचीही अनेक कारणे व उपाय त्यांनी सांगितलेले आहेत. एकूणच बाबासाहेबांचे हे आर्थिक विचार आजही आपल्या समाजाला उपयुक्त असलेले दिसून येतात.

संदर्भग्रंथ -

१) पाटील जे. एफ.(संपा) आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, 2009.

२) कुलकर्णी बी.डी. व ढमढेरे एस.व्ही. आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड प्रकाशन पुणे, 2011.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे.खंड १८